# अमरावती जिल्यात धानोरा (मोगल) व घुईखेड येथे २ मेला शेतकरी मिशनचा "सरकार आपल्या दारी" कार्यक्रम

**दिनांक १ मे २०१६**

शेतकऱ्यांच्या खरीप हंगाम तोंडवर आल्यावर आता नवीन पिककर्ज, ग्रामीण जनतेला काम, अन्न, आरोग्य, गुरांना चारा व पाणी यासह वीज वितरण, शिक्षण, प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न यांना सरकार, प्रशासन, लोक प्रतिनिधी व सामाजिक संस्था यांच्या पुढाकाराने २ मे रोजी अमरावती जिल्यात धानोरा (मोगल) व घुईखेड येथे २ मेला शेतकरी मिशनचा "सरकार आपल्या दारी" कार्यक्रम हा कार्यक्रम कै वसंतराव नाईक शेतकरी मिशनने आयोजित केला आहे या कार्यक्रमाला प्रशासनकडून जिल्हाधिकारी किरण गित्ते सह महसूल, कृषी, ग्रामविकास, वीज वितरण, अन्न पुरवठा, आरोग्य, रोजगार, शिक्षण, पोलीस प्रशासन यांच्या विभागाच्या तालुका व ग्रामस्तरीय अधिकारी -कर्मचारी उपस्थित राहणार असुन या भागातील लोकप्रिय आमदार विरेन्द्रभाऊ जगताप यांचेसह सर्व जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सद्‌यस तसेच सर्व सरपंच व ग्रामपंचायतीचे सद्‌यस यांना सादर आमंत्रित करण्यात आले असुन, ग्रामीण जनतेनी आपल्या सर्व अडचणी व सरकारी योजनामध्ये होणाऱ्या गैरप्रकार समोर आणण्याकरिता कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन शेतकरी मिशनचे अध्क्षश किशोर तिवारी यांनी केली आहे

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनेनुसार "सरकार आपल्या दारी" या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील महसूल, कृषी, ग्रामविकास, वीज वितरण, अन्न पुरवठा, आरोग्य, रोजगार, शिक्षण, पोलीस प्रशासन यांच्या विभागाच्या तालुका व ग्रामस्तरीय अधिकारी -कर्मचारी यांच्या तक्रारीची सुनावणी व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून समाधान व कारवाई साठी अधिकारी -कर्मचारी चेतना जागृती अभियानाचा एक भाग म्हणून धानोरा (मोगल )तालुका चांदूर (रेल्वे ) जिल्हा अमरावतीला २ मे दुपारी २ वाजता व घुईखेड चांदूर (रेल्वे ) जिल्हा अमरावतीला २ मे दुपारी ४ वाजता जनसुनावणी ठेवण्यात आली आहे .